# द साउथ इंडिअन एजुकेशन सोसायटी

## कोरोना विषाणूचा संसर्ग रोखण्यासाठी महाविद्यालयाने तयार केलेली नियमावली:-

१. महाविद्यालयाच्या आवारात मास्कचा वापर अनिवार्य आहे. मास्क नसल्यास आवारात प्रवेश दिला जाणार नाही.

२. महाविद्यालयीन कर्मचारी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, कंत्राटी कामगार आणि विद्यार्थी यांनी योग्य ते ओळखपत्र बाळगणे अनिवार्य आहे.

३. महाविद्यालयातील सर्व प्रवेश धारकांना आपल्या मोबईल मधील “आरोग्य सेतू” अप्लिकेशन (App) अपडेट ठेवणे आवश्यक आहे. महाविद्यालयात प्रवेश करताना “आरोग्य सेतू” अप्लिकेशन चालू स्थिती (Current Status) सुरक्षारक्षकांना दाखवणे अनिवार्य आहे.

४. सर्व प्रवेश धारकांना शारिरीक तापमान मोजणी आणि निर्जन्तुकिरण करून घेणे बंधनकारक आहे.

५. शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि कंत्राटी कामगार यांच्या व्यतिरिक्त अन्य व्यक्तींना प्रवेश नाकारण्यात येईल. तसेच अन्य व्यक्तींना महाविद्यालयात काही कामानिमित भेट द्यावयाची असेल तर त्यांनी भेटणाऱ्या कर्मचारी व्यक्तीकडून भेट पूर्वनियोजित करून घ्यावी.

६. अन्य व्यक्ती आणि विद्यार्थी यांनी “विझीटर स्लीप”(Visitor Slip) भरावी आणि काम झाल्या बरोबर ती स्लीप परत सुरक्षारक्षकांकडे जमा करणे अनिवार्य आहे .

७. सर्व प्रवेश धारकांनी एकमेकांमधे किमान सहा फुटाचे अंतर ठेवावे.

८. महाविद्यालयात तसेच महाविद्यालयातील आवारात थुंकण्यास मनाई आहे .

९. महाविद्यालामध्ये विद्यार्थ्यांच्या मानसिक चिंता, ताणतणाव आणि भीती यांचे निवारण करण्यासाठी “विशेष समुपदेशक” यांची नेमणूक केली आहे.

१०. सर्वांनी वैयक्तिक पिण्याच्या पाण्याची बाटली आणि सानिटायझर सोबत ठेवावे.

११. पुस्तके आणि इतर शैक्षणिक साहित्य एकमेकांना हस्तांतरित करण्यास मनाई आहे.